# लातूर शहर महानगरपालिका

## क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी 100 दिवसांचा कृती आराखडा

# 1. संकेतस्थळ

## अ) वापरण्यातील सुलभता

## ( User Friendly )

**लातूर शहर महानगरपालिकेचे संकेतस्थळ mclatur.org नागरिकांना वापरण्यासाठी सुलभ असावे या पद्धतीने अद्यावत केले आहे.**



# संकेतस्थळ

आ) माहितीचे अद्ययावतीकरण

(Updated Information)

सामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविण्याकरिता संकेतस्थळावर **कार्यालया संबंधित सर्व माहिती** जसे, कार्यालयाचे संपर्क क्रमांक, कार्यपद्धती व अधिकारी यांचे संपर्क क्रमांक अद्यावत केले आहेत.

नागरिकांसाठी **तक्रार व सूचनांसाठी ऑनलाईन पोर्टल** तयार करण्यात आले असून, तक्रारींचे SMS व ई- मेल अलर्ट सुविधा अद्यावत केली आहे.









# संकेतस्थळ

## इ) माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण

## (Proactive disclosure under - RTI Act)

- संकेतस्थळावर RTI बाबत माहिती चे सक्रिय प्रकटीकरण करून RTI Act २००५ कलम ४(ख) नुसार १ ते १७ मुद्द्यांची माहिती अद्यावत करण्यात आली आहे.

## ई) सुरक्षितता

## (Data Security)

- सुरक्षितता (Data / Cyber Security) बाबत Excellent Cyber Forensics And Web Security LLP, Pune कंपनी मार्फत Web VAPT (Vulnerability Assessment and Penetration Testing) व Hardware & Networking उपकरणांसाठी VAPT परीक्षणाची कार्यवाही सुरु आहे.




| Serial Number | Name | Download |
|---|---|---|
| 1 | सामान्य प्रशासन | Download |
| 2 | ग्रंथालय विभाग | Download |
| 3 | नागरी सुविधा केंद्र | Download |
| 4 | ई प्रशासन विभाग | Download |
| 5 | अग्निशमन विभाग | Download |
| 6 | कर संकलन विभाग | Download |
| 7 | क्षेत्रीय कार्यालय सी | Download |
| 8 | क्षेत्रीय कार्यालय डी | Download |
| 9 | एन यु एल एम | Download |
| 10 | मालमत्ता विभाग | Download |
| 11 | विधी विभाग | Download |
| 12 | क्षेत्रीय कार्यालय अ | Download |
| 13 | क्षेत्रीय कार्यालय बी | Download |
| 14 | भांडार विभाग | Download |






# संकेतस्थळ

## ३) लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करून ऑनलाईन प्रसिद्ध करणे

लोकसेवा हक्क अधिनियम 2015 संदर्भातील सर्व माहिती व अधिसूचित केलेल्या सेवा, नियुक्त केलेले पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपीलीय अधिकारी, तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 संकेतस्थळावर अद्यावत केली आहे.

लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित 84 सेवांपैकी सर्व सेवा ऑनलाईन पोर्टल अद्यावत केले असून 60 सेवा आपले सरकार पोर्टल सोबत संलग्नित केल्या आहेत.









# 2. सुकर जीवनमान

- लातूर शहरातील खड्डे बुजविण्यासाठी **पॅचर मशीन** खरेदी करण्यात आलेली असून शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठीचे कामे सुरू आहेत, ज्यामुळे पुर्वी वाहतुकीस होणार अडथळा मोठ्या प्रमाणावर कमी होत आहे.

- जास्त प्रमाणात नागरिकांची होणारी गर्दी चे विभाग जसे NULM, PMAY,रमाई आवास योजना, जन्म-मृत्यू विभाग, विवाह नोदंणी विभाग असे विभाग मुख्यालयाच्या तळ मजल्यावर स्थानांतरित करून वृद्ध / विकलांग नागरिकांना ये-जा करावयास **लिफ्ट** लावण्यात आली आहे.






# सुकर जीवनमान

केंद्र शासन पुरस्कृत दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत ठाकरे चौक येथे **नागरी निवा-याचे** बांधकाम पूर्ण झाले आहे.

- उपलब्ध सोयी
  - **दिव्यांग** बांधवांसाठी स्वतंत्र राहण्याची व्यवस्था
  - महिलांना स्वतंत्र व पुरुषांना **स्वतंत्र** रहाण्याची व्यवस्था
  - स्वच्छ **पिण्याचे पाण्याची** व्यवस्था

















# 3. स्वच्छता

## अ) अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण

कार्यालयातील सर्व अभिलेखांचे **Scanning/Digitization** व सहा गठ्ठे पद्धती नुसार वर्गीकरण करण्यात आले आहे.




## आ) मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे

सर्व **मुदतबाह्य अभिलेखे नष्ट** करुन जुन्या निरुपयोगी जड वस्तू, वाहने, खुर्च्या, टेबल इत्यादींची विल्हेवाट लावण्यात आली आहे.



# स्वच्छता

### इ) जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण

### ई) जुन्या निरुपयोगी वस्तूंची विल्हेवाट

- **जडवस्तू संग्रह नोंदवह्या** अद्यावत करून, जुन्या **जड वस्तूंची विल्हेवाट** लावून काही साहित्य दुरुस्त करून पुन्हा **नव्याने उपयोगात** आणण्यात आले. .



### उ) जुन्या वाहनांचे निर्लेखन

- जुन्या **वाहनाचे निर्लेखन** करण्याचे काम प्रादेशिक परिवहन विभागा मार्फत करण्याचे काम सुरु आहे.



# 4. तक्रार निवारण

| | एकूण प्राप्त तक्रारी | निकाली काढलेल्या तक्रारी | प्रलंबित | १ जानेवारी २०२५ पूर्वी चे प्रलंबित |
|---|---|---|---|---|
| आपले सरकार पोर्टल | 265 | 265 | 00 | निरंक |
| PG पोर्टल | 22 | 22 | 00 | निरंक |
| लोकशाही दिन | 40 | 40 | 00 | निरंक |

- ❑ अभ्यागत भेटीच्या वेळांबाबत सूचना फलक कार्यालयाच्या दर्शनीय ठिकाणी लावण्यात आलेले आहेत.






# 5. कार्यालयीन सोयी सुविधा

## अ) कायमस्वरूपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

- महानगरपालिकेतील इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर **कायमस्वरूपी स्वच्छ पाण्याचे** व्यवस्था करण्यात आली आहे.




## आ) कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृह व्यवस्था

- महानगरपालिकेतील इमारतीमध्ये कर्मचारी व अभ्यागत यांच्या वापराचे **स्वच्छतागृह** वेळोवेळी स्वच्छ करण्यात येतात.



# कार्यालयीन सोयी सुविधा

## इ) अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था

- अभ्यागतसाठी **सुसज्ज प्रतीक्षालय** आहे त्यामध्ये सोफा बसवण्यात आले आहे.
- सुसज्य **हिरकणी कक्ष** स्थापन करण्यात आला आहे
- नागरिकांसाठी **जनसंवाद कक्ष** स्थापन करण्यात आला आहे.








# कार्यालयीन सोयी सुविधा

## ई) कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे

- महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये **नाम फलक** तसेच **दिशादर्शक फलक** लावण्यात आले आहेत.







## ३) कार्यालयाचे सौंदर्यीकरण

- महानगरपालिकेतील इमारतीमध्ये पाणीपुरवठा विभाग बांधकाम विभाग नव्याने **फर्निचर** करण्यात आले आहेत व काही विभागाचे काम चालू आहेत यामुळे कार्यालयाच्या **सौंदर्यकरणात** भर पडली आहे



# 6. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

- आयुक्त, अतिरीक्त आयुक्त, उपायुक्त व सहाय्यक आयुक्त यांनी प्रतेक आठवड्यात 2 क्षेत्रीय भेटी देण्याचे नियोजन केले आहे व त्या नुसार प्रत्यक्ष अंमलबजावणी होत आहे.



# क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

- केंद्र शासन पुरस्कृत सुरू असलेले प्रकल्प योजने अंतर्गत **नागरी बेघर निवारा सुरू** असलेल्या बांधकामास महिला व बालविकास अधिकारी, व्यवस्थापक विभाग यांनी भेटी दिल्या.
- वेळोवेळी  मा. आयुक्त, आति.आयुक्त, मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी वरवंटी कचरा डेपो प्रोसेसींग प्लॅंट ला भेटी देऊन पाहणी करण्यात आली.
- आरोग्य विभाग मनपा द्वारे अधिकारी /कर्मचारी, मनपामध्ये येणारे अभ्यांगत यांचेसाठी **आयुष्य मान कार्ड नोंदणी शिबीर** आयोजीत करण्यात आले.
- मा. उपायुक्त लातूर महानगरपालिका यांनी **शाळांना भेटी** देऊन, शाळांचे सुशोभीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय, शौचालये,व इतर मूलभूत सोयी उपलब्ध करून देण्यात आले. व सर्व शाळांमध्ये **CCTV** कॅमेरा लावण्यात आले.


देशोन्नती
मनपा उपायुक्त खानसोळे यांची मनपा शाळेस अचानक भेट
शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी शाळेच्या अडचणी जाणून घेतल्या












# 7. ई-ऑफिस प्रणाली

- १६ जाने २०२५ रोजी सर्व महानगरपालिकांमध्ये ई-ऑफिस प्रणाली लागू करणे बाबत प्राप्त पत्रानुसार लातूर शहर महानगरपालिकेमार्फत महा-आयटी यांना ई-ऑफिस प्रणाली नोंदणीसाठी पत्र देऊन सर्व कर्मचारी व अधिकारी यांचे .gov मेल तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

- सोबत च महानगरपालिका चे स्वत:चे **e -file management & tracking** सॉफ्टवेअर तयार करण्यात येत असून, त्याची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात आहे.

# 8. आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन

- शहरातील विविध गुंतवणूकदार व उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे, त्यांना पोषक वातावरण निर्माण व्हावे व त्यांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे यासंदर्भात **व्यापारी वर्ग व संघटनांशी बैठकी** घेऊन त्याचे प्रश्न सोडवण्यात आले.
- भाजी विक्रेते,फळ विक्रेते यांना कायमस्वरूपी जागा देऊन त्यांचे **पुनर्वसन** करण्यात आले.
- PM **स्वानिधी** चे १००% लक्ष पूर्ण करण्यात आले.
- महानगरपालिका मार्फत आठवडी बाजारांना कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देऊन भाजी विक्रेत्यांच्या पुनर्वसनासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले.


पुण्य नगरी

गोलाईतील भाजी, फळ विक्रेत्यांचे फ्रूट मार्केटमध्ये पुनर्वसन

**लातूर :** शहराच्या गंजगोलाईतील ७० फुटी सर्कलसह रस्त्यांवर हातगाडीवर व्यवसाय करणारे फळ, भाजीपाला विक्रेत्यांचे कायमस्वरूपी फ्रूट मार्केट येथे पुनर्वसन करण्यात आले आहे. न्यायालयाच्या आदेशाने त्यांना जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. व्यावसायिकांनी दिलेल्या जागेतच व्यवसाय करावेत, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. शहराच्या गंजगोलाई व परिसरात वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याने व उच्च न्यायालयाच्या आदेशाने तेथील भाजीपाला, हात गाडेवाले यांचे अतिक्रमण काढण्यात आले आहे. त्यांचे पुनर्वसन महापालिकेच्या फ्रूट मार्केटमध्ये व्यवसाय करण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे.

Latur Edition
Feb 12, 2025 Page No. 01





लातूर | सकाळ

अधिकारी खरेदी करणार भाजी

विवेकानंद चौक परिसरात आज भरणार आठवडे बाजार



# 9. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

- ❑ लातूर शहर महानगरपालिके मार्फत **नव्याने सेवेत प्रविष्ट ८० अधिकारी/कर्मचारी** यांना अंतर्गत प्रशिक्षण व यशदा पुणे मार्फत प्रशिक्षण देण्यात आले.
- ❑ कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान वापरा संदर्भात नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी श्रेणी १ व श्रेणी २ यांना **यशदा पुणे येथे निवासी प्रशिक्षण** देण्यात आले.
- ❑ कार्यालयामध्ये **कृत्रिम बुद्धिमत्ता** तंत्रज्ञानाचा दैनंदिन कामकाजामध्ये वापर जसे की **पत्र लेखन**, **Automated meeting transcriptions** मध्ये अचूकता व कार्यक्षमता वाढली आहे.












# 10. नाविन्यपूर्ण उपक्रम

- लातूर महानगर पालिकेच्या वतीने सन २०२४-२५ चे सुधारित व २०२५-२६ चे मूळ **अंदाजपत्रक तयार करण्यासाठी त्यामध्ये नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग** असावा यासाठी नागरीकांकडून सूचना मागविण्यात आल्या.



## शहरातील नागरिक ठरवणार मनपाचे बजेट !

### अंदाजपत्रकासाठी सूचना पाठविण्याचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : शहर महानगरपालिकेच्या वतीने सन २०२४-२५ चे सुधारित व सन २०२५-२६ चे मूळ अंदाजपत्रक तयार केले जात आहे. अंदाजपत्रक तयार करताना लातूरकरांच्या मनात काय आहे? हे जाणून घेत त्यांच्या सूचनांचा अंतर्भाव त्यात केला जाणार आहे. यासाठी नागरिकांनी सूचना पाठवाव्यात, असे आवाहन मनपाने केले आहे.

अंदाजपत्रकात नागरिकांचा सहभाग असावा, या हेतूने मनपा गेल्या काही वर्षांपासून हा उपक्रम राबवत आहे. शहरातील नागरिक, सामाजिक संघटना, ज्येष्ठ नागरिकांनी सूचना पाठवाव्यात, असे मनपाला अपेक्षित आहे. मनपाच्या उत्पन्नात वाढ, खर्चात बचत, सेवा-सुविधांमध्ये सुधारणा तसेच शहराच्या विकासात्मक दर्जात वाढ करण्यासाठी नागरिक सूचना करू शकतात. शहरातील नागरिक आपल्या सूचना व अभिप्राय मनपाच्या acdplmc@gmail.com या मेलवर तसेच मनपाच्या मुख्य कार्यालयात लेखा विभागात ठेवलेल्या सूचनापेटीत टाकू शकतात. ०४ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नागरिक सूचना पाठवू शकतात, असे आवाहन महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

Hello Latur
Page No. 1 Jan 30, 2025
Powered by: erelego.com

## नागरिक ठरवणार महापालिकेचे बजेट!

आनंद नगरी
Thursday 2025/01/30

## शहरातील नागरिक ठरवणार लातूर मनपाचे बजेट

### अंदाजपत्रकासाठी सूचना पाठविण्याचे मनपाचे आवाहन

## शहरातील नागरिक ठरवणार लातूर मनपाचे बजेट !

### अंदाजपत्रकासाठी सूचना पाठविण्याचे मनपाचे आवाहन



- लातूर शहर महानगरपालिका मार्फत **Waste to energy bi-methanation Plants** ची उभारणी केली आहे, ज्यातून दररोज **५६० युनिट वीज निर्मिती** केली जाते, तसेच इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन ची उभारणी केली गेली आहे.



# नाविन्यपूर्ण उपक्रम

- लातूर शहर महानगरपालिकेच्या शाळेतील इयत्ता १ ते ८ च्या विद्यार्थ्यांना **स्पोर्ट ड्रेस** चे वाटप करण्यात आले.




- लातूर शहर महानगरपालिका तर्फे **महिलांना** सिटी बस मध्ये **मोफत प्रवास** योजना राबविण्यात येत आहे.

  यामार्फत मोफत स्मार्ट कार्ड वितरित करण्यात आले आहेत.

- एकूण स्मार्ट कार्ड नोंदणी -१०१००
- एकूण स्मार्ट कार्ड तयार - ८२४०
- एकूण वितरित स्मार्ट कार्ड - ६५००

